गुरुवार, दि. २ ऑक्टोबर २०२५ ● जालना ● वर्ष ७ वे ● अंक ४५ वा ● किमंत २ रु. ● पाने ०४

8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल ॲण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

## जालना जिल्ह्यात गुटखा विक्रीवर निर्णायक पावले?

### जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांचे आश्वासन

**दीपक शेळके**

**जालना -** गुटखा बंदी असूनही जिल्ह्यात सुरू असलेल्या खुलेआम विक्रीमुळे नागरिकांमध्ये अस्वस्थता आणि संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे. विशेषतः शाळा-कॉलेज परिसरात सहज उपलब्ध होणारा गुटखा तरुणाईसाठी 'मृत्यूचे बीज' ठरत असल्याने या संदर्भात आता प्रशासनाने अधिक गंभीर भूमिका घेण्याची गरज निर्माण झाली आहे. याच पार्श्वभूमीवर जालना जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी गुटखा विक्री कोणत्याही परिस्थितीत सहन केली जाणार नाही. युवकांचे आरोग्य धोक्यात येऊ देणार नाही. कायद्यानुसार कठोर अंमलबजावणी केली जाईल, असे स्पष्ट आश्वासन युवा आदर्शला देतांना या प्रकरणात लक्ष घालणार असल्याचे स्पष्ट केले आहे.

जिल्हाधिकारी यांच्या आश्वासनामुळे आगामी काही दिवसांत गुटखा माफियांविरोधात विशेष मोहिमा राबविण्याचे संकेत मिळत आहेत.

पोलिस, अन्न व औषध प्रशासन, आरोग्य विभाग आणि महसूल विभाग एकत्र येऊन कारवाई करणार आहेत, असेही संकेत त्यांनी दिले आहे.

गुटखा हा केवळ तंबाखूजन्य पदार्थ नाही, तर मुखाचा कर्करोग, पचनाचे विकार, दात-हाडांचे आजार घडवणारा एक मोठा आरोग्यसंकट आहे. शाळा-कॉलेज परिसरात सहज मिळणारा गुटखा पुढील पिढीची तब्येत धोक्यात घालत असल्याबाबत जिल्हाधिकारी गंभीर दिसल्या.

शाळा व महाविद्यालयांजवळ गुटखा विक्री करणाऱ्यांवर तातडीने



कठोर कारवाई होणार आहे.

प्रशासन युवकांचे भविष्य सुरक्षित ठेवण्यासाठी कोणतीही तडजोड करणार नसल्याचा विश्वास आता निर्माण झाला आहे.

गुटखा विक्री ही केवळ आरोग्याला धोका पोहोचवणारी बाब नाही, तर थेट दंडनीय गुन्हा आहे. खाद्य सुरक्षा व मानके कायदा २००६ (कलम २६, २७ व ५९) नुसार असुरक्षित अन्न विक्रीबद्दल दंड व कैदेची तरतूद आहे. भारतीय दंड संहिता २०२३ (कलम २७४ व २८४) नुसार अपायकारक अन्न/पेय विक्री करणाऱ्यांना कठोर शिक्षा होऊ शकते.

जिल्हाधिकारींच्या आदेशानंतर या कायद्यांचा वापर करून गुटखा माफियांच्या मुसक्या आवळल्या जाण्याची शक्यता आहे.

गुटखा विक्रीवर बंदी असूनही व्यवसाय सुरू राहणे ही प्रशासनाच्या निष्क्रियतेची कबुली असल्याचे नागरिक खुलेपणाने बोलत होते. मात्र आता जिल्हाधिकारींच्या ठोस आश्वासनामुळे तरुणाईचे आरोग्य धोक्यात जाणार नाही या विश्वासाची नवी पहाट नागरिकांना दिसू लागली आहे. जालना जिल्ह्यातील गुटखा विक्रीमुळे निर्माण झालेली भीषण परिस्थिती थांबवण्यासाठी जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांचे आश्वासन हे निर्णायक टप्पा मानले जात आहे. जर प्रशासनाने खरोखरच विशेष मोहिमा राबवून कठोर कारवाई केली, तर गुटखा बंदी केवळ कागदावर न राहता वास्तवात दिसेल.

युवकांचे भविष्य सुरक्षित ठेवण्यासाठी प्रशासनाने घेतलेली ही जबाबदारी जनतेच्या आरोग्यासाठी नवा आशावाद निर्माण करत आहे.

महिलांची गर्भाशय मुखाची मोफत कर्करोगपूर्व तपासणी शिबीर

## नारी स्वस्थ असेल तरच समाज खऱ्या अर्थाने सशक्त - खांडेकर

**जालना । प्रतिनिधी -** स्वस्थ नारी, सशक्त परिवार अभियान अंतर्गत लायन्स क्लब ऑफ जालना डायमंड व जालना महानगरपालिकेच्या शहरी प्राथमिक आरोग्य केंद्राच्या संयुक्त विद्यमाने मंगळवार दि. ३० सप्टेंबर रोजी सिंगल जीन भागातील अंकुर हॉस्पिटलमध्ये आयोजित गर्भाशय मुखाच्या कर्करोगपूर्व मोफत तपासणी शिबिराचा १५५ महिलांनी लाभ घेतला. यापैकी संशयित २५ महिलांची पॅप स्मीअर ही महत्त्वाची चाचणी करण्यात आली.

या शिबिराचे उद्घाटन लॉयन्स क्लब डायमंडचे मार्गदर्शक सुभाषचंद्र देवीदान यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी जालना महापालिकेचे आयुक्त संतोष खांडेकर, सहाय्यक आयुक्त केशव कानपुडे, डॉ. दिपक भालेराव, अंकुर हॉस्पिटलचे संचालक व स्त्रीरोग तज्ञ तसेच लायन्स क्लब ऑफ जालना डायमंडचे सचिव डॉ. रामकृष्ण गौल, अमोल बांगड, सुनील बियाणी, बालाजी बांडे आदींची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी श्री. खांडेकर म्हणाले की, नारी स्वस्थ असेल तरच समाज खऱ्या अर्थाने सशक्त होतो. महिलांचे आरोग्य हे कुटुंब व पान २ वर

## पोलीस पाटील भरती अर्जाकरीता मुदतवाढ

**जालना । प्रतिनिधी -** जालना जिल्ह्यातील उपविभागीय दंडाधिकारी जालना, अंबड, भोकरदन व परतूर यांच्यामार्फत सुरू असलेल्या पोलीस पाटील भरती-२०२५ कार्यक्रमासाठी ऑनलाईन अर्ज दाखल करण्याची अंतिम मुदत वाढविण्यात आली आहे. यापूर्वी अर्ज करण्याची 'शेवटची तारीख ३० सप्टेंबर, २०२५ रात्री ११:५९ वाजेपर्यंत निश्चित करण्यात आली होती. परंतु जिल्ह्यातील पुरपरिस्थिती व पर्जन्यमानाचा विचार करून अर्ज पान २ वर

अरविंद देशमुख मराठा महासंघाच्या राष्ट्रीय कार्यकारणीवर

## लढवय्या नेतृत्वाची राष्ट्रीय पातळीवर दखल

**जालना । प्रतिनिधी -** अखिल भारतीय मराठा महासंघाच्या राष्ट्रीय कार्यकारिणीत जिल्हाध्यक्ष अरविंद देशमुख यांची विभागीय सचिव पदावर बिनविरोध निवड झाली आहे. आक्रमक व लढवय्या नेतृत्वाची दखल घेत राष्ट्रीय स्तरावर झालेली ही निवड जालना जिल्ह्यासाठी अभिमानास्पद आहे.

अखिल भारतीय मराठा महासंघाची वार्षिक सर्वसाधारण सभा व त्रैवार्षिक निवडणूक २८ सप्टेंबर रोजी कोल्हापूर येथे पार पडली. निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी २०२५-२०२८ या कार्यकाळासाठी राष्ट्रीय पदाधिकाऱ्यांची घोषणा केली. त्यानुसार अध्यक्षपदी राजेंद्र नामदेव कोंढरे, विभागीय उपाध्यक्षपदी नरेंद्र अण्णासाहेब पाटील, उपाध्यक्षपदी वसंतराव दत्तोबा मुळीक, सरचिटणीसपदी प्रमोद बळवंत जाधव, कोषाध्यक्षपदी प्रकाश वसंतराव देशमुख तर विभागीय सचिवपदी अरविंद बाळासाहेब देशमुख यांची निवड करण्यात आली. या सर्वसाधारण सभेत महासंघाच्या शतकोत्तर रौप्यमहोत्सवी वर्षानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन तसेच महाराष्ट्रातील महापुरग्रस्त बांधवांसाठी मदतकार्य आदी महत्त्वपूर्ण ठराव मंजूर करण्यात आले.



जालना जिल्हाध्यक्ष म्हणून गेल्या २२ वर्षांपासून निष्ठेने कार्यरत असलेले अरविंद देशमुख हे लढवय्या व्यक्तिमत्त्व म्हणून परिचित आहेत. जिल्ह्यातील आंदोलन, मोर्चे असो वा सामाजिक प्रश्न, त्यांनी आक्रमक नेतृत्वातून नेहमीच प्रामाणिक लढा उभारला आहे. आंदोलन प्रसंगी गुन्हे दाखल होऊनही त्यांनी आपला ठाम व संघर्षशील बाणा ढळू दिलेला नाही. जाती-धर्म भेद न ठेवता सर्व समाजाशी सलोख्याचे संबंध ठेवणारे आणि मदतीसाठी सदैव तत्पर राहणारे अशी त्यांची ओळख असून, क्रीडा क्षेत्रात ते समर्पित भावनेने योगदान देत आहेत. या उल्लेखनीय कार्याची पान २ वर

## जिल्हास्तरीय कला प्रदर्शनास शुक्रवारपासून जालन्यात प्रारंभ

### तीन दिवस उपक्रम; कलाप्रेमींसाठी मेजवानी

**जालना । प्रतिनिधी -** जिल्ह्यात प्रथमच ३, ४ व ५ ऑक्टोबर रोजी जालना येथील मोतीबागेजवळील अंकुशराव टोपे महाविद्यालयाच्या सभागृहात भव्य कलाप्रदर्शन अर्थात 'मान्सून शो २०२५ ' आणि कला शिक्षकांसाठी खास कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे.

यशवंतराव चव्हाण सेंटर (मुंबई ), जिल्हा केंद्र जालना , रोटरी क्लब जालना आणि अजिंठा चित्रकला महाविद्यालय जालना यांच्या संयुक्त विद्यमाने या अभिनव उपक्रमाचे प्रथमच आयोजन जालना शहरात पान २ वर



जालना शहराचे आराध्य दैवत मंमादेवी माताचे दर्शन घेताना शहरातील प्रसिद्ध उद्योजक घनश्यामसेठ गोयल. (छाया - शरद खानापुरे )

युवा आदर्श

महालक्ष्मी...

चौदा रत्ने उपजली
ती समुद्र मंथनातूनि
मा हिरण्यरजतसृजा
आली लक्ष्मीपद्मिनी
हिरण्वर्णा तू सुवर्णा
गं हस्तनाद प्रबोधिनी
जनकल्याणार्थ सार्थ
अवतरली पुष्करणी
तूच सीता तूच राधा
पद्मा कृष्णा रुक्मिणी
पिता प्रभु समुद्र देव
माता महा तिरंगिनी
लक्ष्मी प्रतिक कलश
गजांतलक्ष्मी पुजनी
स्वच्छता प्रिय तिला
वंदतात ती केरसुणी
शंख तुझा गं सहोदर
नित्यपुष्टा करीषिणी
कामदेव अपत्य प्रिय
समुद्र तनया मोहिनी
विष्णुप्रिया कृपाकरी
दुःख दारिद्र्य हारिणी
शंख चक्र कमलधरा
अष्टलक्ष्मी वरदायिनी

हेमंत मुसरीफ पुणे
9730306996.

## जालना जिल्ह्यात धनगर समाजाचे आक्रोश आंदोलन

### दीपक बोऱ्हाडे यांच्या आमरण उपोषणाचा १६ वा दिवस, तब्येतीची गंभीर स्थिती आणि ठिकठिकाणी रास्ता रोको





**जालना । प्रतिनिधी -** धनगर समाजाला अनुसूचित जमाती (ST) प्रवर्गातून आरक्षण मिळावं या मागणीसाठी सुरू असलेलं आमरण उपोषण निर्णायक टप्प्यात दाखल झालं आहे. दीपक बोऱ्हाडे यांच्या उपोषणाचा आज १६ वा दिवस असून, कालपासून त्यांची तब्येत खालावल्याची माहिती समोर आली आहे. बीपी लो झाल्यामुळे रात्री उशिरा डॉक्टरांनी तपासणी केली, मात्र बोऱ्हाडे यांनी उपोषण सोडण्यास नकार दिला आहे. तहसीलदार छाया पवार यांनी प्रत्यक्ष उपोषणस्थळी भेट देऊन त्यांना समजावण्याचा प्रयत्न केला, पण बोऱ्हाडे आपल्या मागण्यांवर ठाम असल्याने तहसीलदारांना माघारी फिरावे लागले.

धनगर समाजाला आरक्षणाचा प्रश्न अनेक वर्षांपासून प्रलंबित आहे. सरकारने वारंवार समित्या नेमूनही ठोस निर्णय घेतलेला नाही. त्यामुळे संतापलेला समाज आता रस्त्यावर उतरला आहे. बोऱ्हाडे यांनी केलेल्या उपोषणाला धनगर बांधवांकडून मोठं समर्थन मिळत आहे.

**ठिकठिकाणी चक्का जाम आंदोलन**

दीपक बोऱ्हाडे यांच्या मागणीच्या समर्थनार्थ राज्यभर धनगर समाजाकडून चक्का जाम आंदोलन करण्यात आलं. जालना शहरातील अंबड चौफुली चौकात रास्ता रोको करत आंदोलकांनी वाहतूक ठप्प केली. काजळा फाटा येथे रस्त्यावर टायर जाळून आंदोलन करण्यात आलं. अंबड-जालना रस्त्यावरील वाहतूक पूर्णपणे विस्कळीत झाली. आंदोलकांनी धनगर समाजाला ढ्ढ प्रवर्गातून आरक्षण द्या अशा घोषणांनी परिसर दणाणून सोडला.

**प्रशासनाची अडचण वाढली**

आंदोलनामुळे जालन्यातील कायदा व सुव्यवस्थेचं आव्हान अधिक गंभीर झालं आहे. वाहतूक ठप्प झाल्याने शेतकरी, व्यापारी आणि सामान्य नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागला. तहसीलदार छाया पवार यांनी जनतेला आवाहन केलं की, उपोषणस्थळी गर्दी करू नये आणि बोऱ्हाडे यांच्याशी अनावश्यक बोलणं टाळावं. मात्र परिस्थिती अधिक तापलेली असून आंदोलन राज्यव्यापी होण्याची चिन्हं दिसत आहेत.

**राजकीय दबाव वाढतोय**

या संपूर्ण प्रकरणाने राज्य सरकारसमोर दुहेरी अडचण उभी राहिली आहे, एका बाजूला आरक्षणाचा संवेदनशील आणि कायदेशीर गुंता. दुसऱ्या बाजूला समाजाची वाढती अस्वस्थता व आंदोलने. राज्य सरकारकडून तातडीने सकारात्मक निर्णय न घेतल्यास आंदोलन अधिक आक्रमक होईल, असा इशारा धनगर नेत्यांनी दिला आहे.

दीपक बोऱ्हाडे यांच्या उपोषणामुळे जालना जिल्ह्यात आंदोलनाचं वातावरण चिघळलं आहे. १६ दिवसांपासून सुरू असलेलं उपोषण आता आरोग्याच्या गंभीर संकटात रूपांतरित झालं असून, बोऱ्हाडे यांचा जीव धोक्यात येण्याची शक्यता वाढली आहे. यामुळे प्रशासन आणि राज्य सरकारवर प्रचंड दबाव निर्माण झाला आहे.

धनगर समाजाची मागणी केवळ आरक्षणापुरती मर्यादित नसून, त्यांच्या सामाजिक-आर्थिक न्यायासाठीचा हा लढा असल्याचं पान २ वर

## संपादकीय

# भारत मातेचे थोर सुपुत्र

भारत मातेचे थोर सुपुत्र, देशाचे दुसरे पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांची आज जयंती आहे. लालबहादूर शास्त्री यांचे पूर्ण नाव लालबहादूर शारदाप्रसाद वर्मा असे होते. पण १९२५ साली बनारस येथील काशी विद्यापीठाची शास्त्री ही पदवी लालबहादूर यांनी मिळवली त्यामुळे त्यांना सर्वजण शास्त्री म्हणू लागले पुढे त्यांनी आपल्या नावापुढे शास्त्री हेच नाव लावले आणि ते लालबहादूर वर्माचे लालबहादूर शास्त्री बनले. त्यांचा जन्म २ऑक्टोबर १९०४ रोजी उत्तर प्रदेशातील मोगल सराई या गावात झाला. लालबहादूर शास्त्री दीड वर्षाचे असतानाच त्यांच्या वडिलांचे निधन झाले. त्यांच्या आईनेच त्यांचा सांभाळ केला. लालबहादूर शास्त्री यांचे बालपण गरिबीतच गेले. घरची हलाखीची परिस्थिती असूनही लालबहादूर यांनी आपले शिक्षण पूर्ण केले. शालेय वयातच लाला लजपतरायांनी स्थापन केलेल्या द सर्व्हन्ट ऑफ द पीपल सोसायटीचे सदस्यत्व त्यांनी घेतले. महात्मा गांधींच्या विचाराने ते प्रभावित झाले होते. गांधीजींच्या असहकार चळवळीत त्यांनी भाग घेतला. गांधीजींसोबत दांडी यात्रेतही त्यांनी भाग घेतला होता. १९३९ साली त्यांची पंडित नेहरूंशी भेट झाली आणि ते स्वातंत्र्य चळवळीत सहभागी झाले. देश स्वतंत्र झाल्यावर पंडित नेहरुंच्या पहिल्या मंत्रिमंडळात त्यांनी रेल्वे व वाहतूक, दळणवळण, वाणिज्य व उद्योग आणि गृहमंत्रीपद भूषविले. ते रेल्वेमंत्री असताना एकदा रेल्वेचा अपघात झाला होता त्यात काही प्रवाशांना स्वतःचा जीव गमवावा लागला होता या अपघाताची नैतिक जबाबदारी स्वीकारुन त्यांनी रेल्वेमंत्रीपदाचा राजीनामा दिला होता. देश आणि संसदेने त्यांच्या या अभूतपूर्व निर्णयाची प्रशंसा केली होती. तत्कालीन पंतप्रधान पंडित नेहरू यांनीही त्यांच्या या इनामदार वृत्ती आणि आदर्श मूल्यांची संसदेत प्रशंसा केली होती. पंडित नेहरुंच्या आकस्मिक निधनानंतर देशाची धुरा त्यांच्याकडे आली. ९ जानेवारी १९६४ रोजी देशाचे दुसरे पंतप्रधान म्हणून त्यांनी शपथ घेतली. शपथ घेतल्यानंतर अल्पावधीतच त्यांनी आपल्या कर्तुत्ववाने पंतप्रधानपदावर ठसा उमटविला. प्रखर राष्ट्रवादी असलेल्या शास्त्रीजींनी आपल्या पंतप्रधान कालावधीत देशहिताचे अनेक निर्णय घेतले. १९६५ साली पाकिस्तानने आगळीक करुन भारताशी युद्ध पुकारले. पण देशात लालबहादूर शास्त्री यांच्यासारखे खंबीर नेतृत्व असल्याने पाकिस्तानला माघार घ्यावी लागली. आपल्या कणखर नेतृत्वाने त्यांनी पाकिस्तानला पराभूत केले. या युद्धानंतर त्यांच्या नेतृत्वाने जगातील मातब्बर नेते प्रभावित झाले. जय जवान, जय किसान या त्यांच्या मंत्राने देश भारावून गेला. लालबहादूर शास्त्री हे अवघे १९ महिने पंतप्रधान होते. या १९ महिन्यांच्या कालावधीत जनसामान्यांच्या ह्रदयात त्यांनी अढळ स्थान मिळवले. ११ जानेवारी १९६६ रोजी त्यांचे निधन झाले. जयंतीदिनी शास्त्रीजींना विनम्र अभिवादन!


**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

# करवीर निवासिनी; कोल्हापूरची श्री अंबाबाई!

कोल्हापूरच्या अंबाबाई (महालक्ष्मी) मंदिराचा समावेश शक्तीपिठांमध्ये केला जातो. संपूर्ण भारत तसेच नेपाळ आणि बांग्लादेशचा काही भाग यांमध्ये मिळून एकूण ५१ शक्तीपिठे सांगितली जातात. हे सर्व शक्तीपिठ हे आदि शक्तीच्या विविध रूपांना समर्पित आहेत. शक्तीपिठांच्या निर्मितीबद्दल एक कथा विविध पुराणांमध्ये समाविष्ट आहे. शक्तीने जेव्हा सती रूपामध्ये अवतार घेऊन महादेवांसोबत विवाह केला होता, त्यावेळची ही कथा आहे. सतीचे वडील दक्ष यांनी एक यज्ञ आयोजित केलेला होता, जेथे महादेवांना सोडून इतर सर्व जावयांना दक्षाने आमंत्रित केले होते. दक्षाचे सर्व जावई हे विविध देवतागण होते. सतीला वाटले की महादेवांना आमंत्रित करणे दक्ष चुकून विसरले असावे. त्यामुळे सती न बोलावणे येताही तेथे उपस्थित झाली. यावेळी दक्ष राजाने महादेवांच्या राहणीमान आणि वेशभुषेवरून सतीला हिनवले. पतीचा अपमान सहन न झाल्याने रागाच्या भरात तिने यज्ञकुंडात उडी मारून आत्मदाह करून घेतला. सतीच्या अशा प्रकारे निघून जाण्यामुळे महादेवांना खूप रग आला. विरभद्र रूपात त्यांनी दक्ष राजाचा यज्ञ उद्ध्वस्त केला आणि दक्ष राजास मारून टाकले. मात्र त्यांचा राग येथेच शांत झाला नाही. राग आणि शोकाच्या भरात त्यांनी सतीचे अर्धवट जळालेले मृतदेह आपल्या खांद्यावर घेतले आणि संहार तांडव हे नृत्य आरंभ केले. संहार तांडवामुळे संपूर्ण ब्रम्हांड नष्ट होईल अशी भिती सर्व देवतांना वाटू लागली. महादेवांना शोकस्थितीतून बाहेर काढण्यासाठी विष्णूंनी आपल्या सुदर्शन चक्राने सतीच्या शरिराचे तुकडे केले. सतीच्या शरीराचे हे तुकडे पृथ्वीवर ज्या ज्या ठिकणी पडले, तेथे एक शक्तीपिठ निर्माण झाले. महाराष्ट्रामध्ये कोल्हापूर सोबतच तुळजापूर (जि धाराशिव) आणि माहूर (जि नांदेड) अशी आणखी दोन शक्तीपिठे आहेत. तर वणी (जि नाशिक) येथील सप्तशृंगी देवीला अर्धे शक्तीपिठ मानण्यात येते. कोल्हापूर येथे सतीचा डोळा पडला होता असे मानले जाते. यामुळे आपोआपच या जागेचा संबंध सती (शक्तीचे एक रूप) यांच्यासोबत जोडला गेलेला आहे.तमोगुणयुक्त रूपात महाकाली तर सत्वगुणायुक्त रूपात महासरस्वती झाली. अशी कथा आहे. पुढे तिने लक्ष्मी, ब्रह्मदेव यांना जन्म दिला. महाकालीने शंकर, त्रयी, विद्या यांना तर महासरस्वतीने विष्णू, गौरी यांना जन्म दिला.अशाप्रकारे विश्वनिर्मितीला प्रारंभ झाला. विराट स्वरूपात प्रगट झालेली काश्मीर, कांची, कामाख्या ही देवीची तीन पीठे होत. अंबाबाई, महालक्ष्मीच्या देवालयाबाबत संशोधन परिपूर्ण नाही. शिलाहार देवीचे भक्त असल्याने देवीचा वरप्रसाद त्यांना

मिळाल्याचे संदर्भ काही ठिकाणी आढळतात. मंदिरातील रचना चक्रराज श्रीयंत्र सर्वतोभद्रमंडल प्रमाणे आहे. महालक्ष्मीची मूर्ती दगडी चौथऱ्यावर असून सुंदर नक्षीकाम केलेला घाटी दरवाजा, गरुड मंडप. पाच शिखरांसह गर्भगृहमंडप, मध्यमंडप, गरुडमंडप असे तीन मंडप आहेत. भगवान शंकर आणि परमदेवीमध्ये स्थानाच्या महानतेवरून झालेला वाद भगवान विष्णूंनी संपवला. विश्वनिर्मितीनंतर भगवान विष्णूने काशी, करवीरची निर्मिती केली असे जाणकार सांगतात. लक्ष्मीने कोल्हासूर राक्षसाचा वध केल्यानंतर नगराचे नाव त्याच्या नावावर ठेवण्याची त्याची इच्छा असल्याने हे शहर कोल्हापूर म्हणून ओळखले जाऊ लागले. शैवांच्या मते अंबाबाई पार्वतीचे रूप आहे तर वैष्णव तिला महालक्ष्मीचे रूप मानतात. करवीरक्षेत्र श्रीमहालक्ष्मीचं आवडतं ठिकाण असल्याने तिथं नतमस्तक होणाऱ्या भक्ताला भक्तिचा पाझर फुटतो. खण नारळाची ओटी, हिरवा चुडा, तेजोमय प्रभावळी जरतार शोभे पिवळ्या रंगाची. स्त्रीशक्तीचा जागर भोंडला, भुलाई चाले, बाया जमती हळदीकुंकवासी. महालक्ष्मी, अंबा मातेचा उदो उदो करत दिवट्या पेटतात, अंबा आली गोंधळाला, चला वाजवू संबळाला म्हणतं,राती जागविल्या जातात. अशा महाकाली महालक्ष्मी, महासरस्वती रूपातल्या करवीर निवासिनी अंबाबाई,श्री महालक्ष्मीला आमचा दंडवत...!! अंबाबाईच्या नावाने चांगभलं...!!

**शिवाजी विठ्ठल चौगुले.**
**कागल-कोल्हापूर.**



# विजयादशमी; दृष्टप्रवृत्तीचा नाश करून मिळालेला विजय

लंकापती रावन हे महान राजनितिज्ञ व पराक्रमी राजा होते म्हणूनच त्यांना लंकापती रावण संबोधले जायचे.परंतु त्यांच्यात काही दृष्ट व वाईट प्रवृत्ती होत्या.त्यांनी माता सीतेचे हरण करून राक्षसीप्रवृतीचा आगास केला. हा त्यांचा सर्वात मोठा गुन्हा होता आणि यातुनच लंकापती रावण परास्त होण्याला सुरूवात झाली.यानंतर रावणाने पुर्णपणे अधर्माचा मार्ग पत्करला अधर्माचा मार्ग सोडण्यासाठी देवी-देवता, आप्त-नातेवाईक, राजनैतिज्ञ गुरूसह अनेकांनी प्रयत्न केले. परंतु रावणाच्या अहंकारापुढे संपूर्ण प्रयत्न निष्फळ ठरले व सीतेला हस्तगत करण्याच्या जीद्दीने रावणाने आपल्याच संपूर्ण कुळाला युध्दाच्या खाईत लोटले व लंकापती रावण यांच्या सर्वनाशाची आकाशवाणी झाली. हळूहळू संपूर्ण मोठ-मोठे बलाढ्य शुरविर धाराशाही झाले.यात मुख्यत्वेकरून मेघनाथ, कुंभकर्णासारखे महाबलशाली यांनाही रावणाने मृत्यूच्या खाईत लोटले. त्याच प्रवृत्तीचा नाश करण्यासाठीच प्रभुश्रीरामचंद्र हे धरतीवर अवतरले व रावणाच्या वाईट प्रवृत्तीचा रामानी वध केला. विजयादशमी म्हणजे असत्याचारावर सत्याचा विजय, अशुध्दतेवर शुध्दतेचा विजय, अंधारावर प्रकाशाचा विजय,अमानुषतेवर मानवतेचा विजय, निसर्गाचा होत असलेला ह्रास टिकवुन ठेवण्यासाठी वृक्षलागवड करणे हाही विजयच, म्हणजेच आत्म्यातील रावणाचे दहण करुन रामाने सांगितलेला सत्याचा मार्ग अवलंबने हाच खरा सण विजयादशमी होय. राम हे आदर्शपुरुष त्यामुळेच भारताने नेहमी आदर्शाचीच भुमिका जोपासली आहे.तेव्हाच भारतात सर्व धर्म समभाव दिसून येतो. त्याचप्रमाणे भारतीय संस्कृतित सर्वात महत्वाचा आणि शुभ दिवस म्हणजे विजयादशमी साडेतिन मुहुर्तापैकी एक असे या दिवसाला आगळेवेगळे महत्व आहे. घटस्थापनेपासुन तर दस-यापर्यत संपूर्ण भारतात उत्सहाचे,आनंदाचे व मांगल्याचे वातावरण आपल्याला पहायला मिळते व याच दिवसापासुन दिवाळीचा शंखनाद संपूर्ण भारतात गुंजतो. नवरात्र उत्सवामध्ये देवीची ९ दिवस आराधना करून नवरात्र उत्सव साजरा केला जातो व दशमीला म्हणजेच विजयादशमीला दसरा उत्सव मोठ्या थाटात भारतभर साजता केला जातो. हा दीवस म्हणजे असुरीशक्तीचा नाश व सत्याचा विजय मानले जाते. दशमीला प्रभुरामचंद्राने रावणाच्या वाईट प्रवृत्तीचा संहार करुण असुरीशक्तीला संपवुन मानवतेचे रक्षण केले. त्या निमित्यानेच विजयादशमी उत्सव साजरा केला जातो. याच दीवशी मॉ जगदंबेने अनेक राक्षसाचा वध करुण विजय प्राप्त केला. त्याच प्रमाणे पांडव अज्ञातवासात असतांना पांडवांनी शम्मीच्या झाडावर लपविलेली शस्त्रे याच दीवशी काढण्यात आली व याच दीवशी रामाने रावणाच्या वाईट प्रवृत्तीचा वध करुन विजय प्राप्त केल्याच्या अनेक कथांमध्ये व पुराणांमध्ये आपल्याला पहायला मिळते. त्याच अनुशंगाने विजयादशमीला सोण्याच्या(आपट्याच्या) पाणाला तीतकेच अतुट महत्व आहे. सोण्याचे पान एकमेकांना देवुन आनंदोत्सव साजरा करतात व लहान-मोठ्यांना शुभेच्छा व आर्शिवाद देतात. त्याचप्रमाणे दसऱ्याच्या दिवशी सर्वसामान्य व शेतकरी आपल्या उपयोगात येणाऱ्या संपूर्ण शस्त्रांची (साहित्याची)पुजा करतांना फुलांसोबत सोण्याचे पाणांनी पुजा अर्चना केली जाते. यावरुन आपण समजु शकतो कि, सोण्याच्या पाणाला विजयादशमीच्या दिवशी कीती आगळेवेगळे महत्व आहे. देशात वाढते प्रदुषण पहाता विजयादशमीचे औचित्य साधून प्रत्येकांनी वृक्षलागवडीकडे लक्ष देण्याची नितांत गरज आहे.कारण प्रत्येक झाडात,फुलात,फळात, मुळात देवीदेवतांचा वास असतोच.त्यामुळे वृक्षलागवडीने देवीदेवतांचे दर्शन अवश्य होईल सोबतच सर्वांना शुध्द हवा, ऑक्सिजन मिळेल व संपूर्ण जीव-जंतुंमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण होईल.सोबतच गुरांना चारा व सावलीचा आनंद घेता येईल.अशाप्रकारे सर्वत्र उत्साहाचे आणि मांगल्याचे वातावरण वृक्षलागवडीमुळे दिसून येईल. दसऱ्याच्या हार्दिक शुभेच्छा!

**रमेश कृष्णराव लांजेवार**
**मो.नं.९९२१६९०७७९,नागपूर**

## पान १ वरुन

### नारी स्वस्थ ...

समाजाच्या सुदृढतेशी थेट निगडित आहे. भविष्यातही अशा उपक्रमांद्वारे अधिक महिलांपर्यंत पोहोचणे हे आपले ध्येय आहे. श्री. देविदान म्हणाले की, गर्भाशय मुखाचा कर्करोग हा वेळेत निदान झाल्यास टाळता येणारा आजार आहे. त्यामुळे प्रत्येक महिलेनं नियमित तपासणी करून स्वतःचं व कुटुंबाचं आरोग्य जपणं अत्यावश्यक आहे. या मोहिमेमुळे अनेक कुटुंबांना नवी आशा आणि सुरक्षितता मिळणार आहे. डॉ. गौल यांनी महिलांमधील गर्भाशय मुखाच्या कर्करोगपूर्व तपासणीचे महत्त्व स्पष्ट केले. त्यांनी सांगितले की या शिबिरात संशयित २५ महिलांच्या पॅप स्मीअर चाचणीचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर संबंधित महिलांना योग्य उपचार व सल्ला दिला जाणार आहे. याप्रसंगी प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी, आरोग्यसेविका, प्रयोगशाळा तंत्रज्ञ, आशा स्वयंसेविका तसेच क्लबचे सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन सुनील बियाणी यांनी केले.

### पोलीस पाटील ...

करण्याची मुदत गुरुवार, २ ऑक्टोबर, २०२५ रोजी रात्री ११:५९ वाजेपर्यंत वाढविण्यात आली आहे. याबाबत अधिकृत सूचना जिल्हा प्रशासनाच्या .क्षरश्रपर.पळल.ळप या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आली असुन, परिक्षार्थ्यांनी त्याची नोंद घ्यावी, असे आवाहन अपर जिल्हादंडाधिकारी शशिकांत हदगल यांनी प्रसिध्दी पत्रकाद्वारे केले आहे.

### लढवय्या नेतृत्वाची ...

राष्ट्रीय अध्यक्ष राजेंद्र कोंढरे यांनी दखल घेत राष्ट्रीय कार्यकारिणीत त्यांचा समावेश केला आहे.

या निवडीबद्दल प्रतिक्रिया देताना अरविंद देशमुख म्हणाले की, राष्ट्रीय कार्यकारिणीत विभागीय सचिव म्हणून मिळालेली जबाबदारी ही माझ्यासाठी अभिमानास्पद तसेच प्रेरणादायी आहे. महासंघाच्या विचारधारेसाठी, समाजातील प्रश्न सोडवण्यासाठी आणि न्याय्य हक्कांसाठी माझा संघर्ष अधिक जोमाने सुरू राहील. ही निवड माझ्या पाठीशी खंबीरपणे उभे राहणाऱ्या जालना जिल्ह्याच्या कार्यकर्त्यांचा विजय असून, त्यांचा विश्वास माझी खरी ताकद आहे. प्रत्यक्ष कामाच्या माध्यमातून राजेंद्र कोंढरे यांचा विश्वास सार्थ ठरवू, असे ते म्हणाले.

### जिल्हास्तरीय कला ...

होत आहे. यासाठी १०० पेक्षा जास्त कलाप्रेमींनी नाव नोंदणी केली आहे. शुक्रवार दि. ३ ऑक्टोबर रोजी सकाळी ११ वाजता महाराष्ट्र कला शिक्षण मंडळ, मुंबईचे संचालक विनोद आर. दांडगे यांच्याहस्ते कलाप्रदर्शनाचे उद्घाटन होणार असून, कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान राज्याचे माजी आरोग्यमंत्री तथा यशवंतराव चव्हाण सेंटरचे जिल्हाध्यक्ष तथा माजी मंत्री राजेश टोपे हे भूषविणार आहेत. याप्रसंगी शिक्षणाधिकारी बाळासाहेब खरात, यशवंतराव चव्हाण सेंटरचे राज्य समन्वयक निलेश राऊत, सेंटरच्या जिल्हा केंद्राचे कोषाध्यक्ष तथा प्रसिद्ध उद्योजक अरूण अग्रवाल, जेष्ठ सदस्य सुनीलभाई रायठ्ठा, रोटरी क्लबच्या अध्यक्षा वर्षा पित्ती आणि दिव्य मराठीचे राज्य प्रमुख सुभाष बोंद्रे यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. दुपारनंतरच्या सत्रात जिल्ह्यातील कला शिक्षकांसाठी कार्यशाळा होणार असून, सांगलीचे आर्टिस्ट दीपक डी. अंकलखोपे आणि नाशिकचे आर्टिस्ट सागर पवार यांची प्रमुख वक्ते म्हणून उपस्थिती राहणार असून, ते अनुक्रमे 'कला शिक्षणातील बदलते स्वरूप' आणि 'फलक लेखन प्रात्यक्षिक' या विषयावर मार्गदर्शन करणार आहेत. जालना शहर व जिल्ह्यातील सर्व कला शिक्षक, कलाप्रेमी, रसिक - नागरिकांनी या कलाप्रदर्शनाचा मोठ्या संख्येने लाभ घ्यावा, असे आवाहन यशवंतराव चव्हाण सेंटरचे सचिव प्रा. डॉ. रावसाहेब ढवळे, प्रा. रणजित बायस व अजिंठा चित्रकला महाविद्यालयाचे प्राचार्य शाह एजास व सर्व सहका-यांनी केले आहे .

### जालना जिल्ह्यात ...

चित्र स्पष्ट होत आहे.

ही परिस्थिती हाताळण्यासाठी सरकारने तातडीने ठोस निर्णय घेतला नाही, तर उपोषणाचं आंदोलन राज्यव्यापी चळवळीचं रूप घेऊन पुढील काही दिवसांत मोठं राजकीय वादळ निर्माण करू शकतं.

# दैठणा खुर्द येथील शेतकरी महिलेच्या टोमॅटो पिकांचे दोन लाखांचे नुकसान

## तातडीने नुकसान भरपाई देण्याची मागणी

**परतूर । प्रतिनिधी -** तालुक्यात अतिवृष्टीने थैमान घातले असून, अनेक शेतकऱ्यांच्या पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. याच मालिकेतील एक हृदयद्रावक घटना दैठणा खुर्द शिवारात घडली आहे. येथील गट नंबर २०६ मधील शेतकरी श्रीमती पार्वतीबाई भगवान ताठे यांच्या शेतात अतिवृष्टीच्या पाण्यामुळे टोमॅटोचे संपूर्ण पीक जळून गेले आहे.

श्रीमती ताठे यांनी मोठ्या कष्टाने आणि मेहनतीने आपल्या एक एकर शेतीत टोमॅटोचे पीक उभे केले होते. पीक काढणीच्या तोंडावर असतानाच, झालेल्या मुसळधार पावसामुळे शेतात पाणी साचले आणि संपूर्ण पीक जळून पूर्णपणे नष्ट झाले. या नुकसानीत त्यांचे अंदाजे दोन लाख रुपयांचे आर्थिक नुकसान झाले आहे.

या अनपेक्षित आपत्तीमुळे शेतकरी महिला श्रीमती ताठे पूर्णपणे हतबल झाल्या आहेत. निसर्गाच्या या अवकृपेमुळे त्यांच्या हाता-तोंडाशी आलेला घास हिरावला गेला आहे.

श्रीमती ताठे यांनी प्रशासनाकडे तातडीने पंचनामा करून या नुकसानीची दखल घेण्याची आणि लवकरात लवकर आर्थिक नुकसान भरपाई देण्याची मागणी केली आहे. अतिवृष्टीमुळे झालेले मोठे नुकसान लक्षात घेऊन शासनाने या शेतकरी महिलेला दिलासा देण्यासाठी प्रशासनाने तातडीने लक्ष देऊन या नुकसानग्रस्त शेतकरी कुटुंबाला आर्थिक मदत देऊन आधार द्यावा अशी मागणी केली आहे.



## सेवाव्रती लघुपट हे जगदीश पुळेकर यांच्या आयुष्यातील महत्वाची निर्मिती - डॉ. शैलेश मोहिते

**मुंबई । प्रतिनिधी -** कुष्ठरोग्यांच्या जीवनात त्यांच्या चेहऱ्यावर हसू यावे यासाठी त्या क्षेत्रात वैद्यकीय सेवा देणाऱ्यांना एके काळी मोठा त्याग करावा लागत असे,समाजात विशिष्ट्य पद्धतीने विशेषतः दुर्लक्षित घटकांतील रुग्णांसाठी काम करताना डॉ. विजयकुमार डोंगरे यांनी आयुष्याला झोकून दिले होते. डोंगरे सरांचे काम जगासमोर येणे आवश्यक होते, समाजातील कोणताही एक विषय घेऊन त्यासाठी सर्वस्व कसे वाहून देता येते असे अनेक विषय आहेत. परंतु जगाला भेडसावणारा हा प्रश्न किती महत्वाचा आहे हे ओळखून जगदीश पुळेकर यांनी ही डॉक्युमेंट्री तयार करून सामाजिक भान जागवणारी उत्तम कमगिरी केली आहे असे उदगार नायर रुग्णालय अधिष्ठदाता डॉ शैलेश मोहिते यांनी काढले. रुग्णसेवा हीच खरी सेवा साधना मानणाऱ्या आणि अनेक दशकं ग्रामीण व शहरी कुष्टरोग निवारण आणि रुग्णसेवेसाठी झटणारे, देशा-परदेशात कॉन्फरन्समध्ये सहभागी होणारे व या विषयावरील ६० पुस्तकांचे लेखक दादर मधील पद्मश्री डॉ. विजयकुमार डोंगरे यांचा जीवनप्रवास आणि असामान्य कार्यावर आधारित ३५ मिनिटांचा लघुपट सेवाव्रती चा विशेष प्रीमियर शो दादर सार्वजनिक वाचनालय आणि काशिनाथ धुरु हॉल ट्रस्ट व मराठी वृत्तपत्र लेखक संघ मुंबई यांच्या संयुक्त वतीने दासावा मध्ये निमंत्रितांसाठी मोफत आयोजित केला होता त्यावेळी डॉ. मोहिते बोलत होते. यावेळी गायकवाड इन्स्टिटयूटचे डॉ. हेमंतराजे गायकवाड म्हणाले की, डॉ. डोंगरे यांना मी वैद्यकीय क्षेत्रातील माझे गुरु मानतो. निस्वार्थी भावनेने रुग्णांसाठी अहोरात्र ते कसे जगायचे याचा मी साक्षीदार आहे. रुग्णसेवा हाच खरा मानवतेचा धर्म आहे व त्यासाठी आर्थिक कमाई दुय्यम मानून त्यासाठीच त्यांनी आयुष्य वेचले. यासाठी त्यांच्या कुटुंबियांनी मोलाची साथ दिली हे सुद्धा तेवढेच मी महत्वाचे मानतो. मुंबई लेप्रसी प्रोजेक्ट संस्थेचे डायरेक्टर डॉ. विवेक पै आपल्या भाषणात म्हणाले की, मुंबई लेप्रसी संस्थेची स्थापना १९७६ मध्ये डॉ डोंगरे यांनी केली. आमच्या दोन्ही संस्थापक डॉक्टरांना भारत सरकारने पद्मश्री पुरस्काराने गौरविले आहे. म्हणजेच कुष्ठरोग निवारण कामाविषयी सरकारी पातळीवर किती महत्व आणि आस्था आहे हे दिसून येते. काही वर्षांपूर्वी बाधित व्यक्तींच्या घृणास्पद स्वरूपाबद्दल समाजाचा प्रतिसाद नाकारण्याचा होता आणि तो रुग्णांना आत्महत्येस प्रवृत्त करण्यापर्यंत पोहोचला होता. परंतु आता कुष्ठरोग शोध मोहीम, उपचार आणि निर्मूलन या त्रिसूत्रीवर आरोग्य विभागाने लक्ष केंद्रित केले आहे. २०२३ मध्ये, भारत सरकारने राष्ट्रीय धोरणात्मक योजना (एनएसपी) आणि कुष्ठरोगासाठी रोडमॅप (२०२३-२७) सुरू केला जेणेकरून २०२७ पर्यंत या आजाराचा संसर्ग शून्य करण्याचे उदिष्टय आहे. डॉ. प्रीतम पाठारे आपल्या भाषणात म्हणाले की, कुष्ठरोग आणि त्याच्याशी संबंधित कलंक या दोन्हींचा प्रभावीपणे सामना करण्यासाठी, त्याचा प्रसार, परिणाम आणि योग्य उपचार समजून घेण्यासाठी ही डॉक्युमेन्ट्री जगभरात या क्षेत्रात काम करणाऱ्यांसाठी मार्गदर्शक ठरणार आहे. त्याचबरोबर प्रभावित व्यक्तींना निरोगी, अधिक सन्माननीय जीवन जगण्यास मदत करणारी ठरणार आहे. या कार्यक्रमात ज्येष्ठ वृत्तपत्र लेखिका श्रीमती मंदाकिनी भट, ज्येष्ठ वृत्तपत्र लेखक पास्कोल लोबो, वसंत हरयाण, रमेश सांगळे यांना वृत्तपत्र लेखक चळवळीसाठी अनेक वर्षे अमूल्य योगदान दिल्याबद्दल जीवन गौरव सन्मान पुरस्काराने गौरविण्यात आले. यावेळी व्यासपीठावर यतीन कामथे, सुरेश शिंदे, कार्यक्रम प्रमुख सुनील कुवरे, आत्माराम गायकवाड, कार्यवाह नितीन कदम, माहिती जनसंपर्क खात्याचे निवृत्त प्रसिद्धी प्रमुख देवेंद्र भुजबळ, अजित नाईक, प्रफुल्ल कळके, प्रोफेसर गोपीनाथ वाघमारे, अनिल समेळ आदी मान्यवर उपस्थित होते, तर ही ॓र्ल्रीशर्पीॢ देशा -परदेशात स्पर्धेसाठी पाठविण्यात येणार असल्यामुळे या विशेष क्षणाचे साक्षीदार होण्यासाठी दासावाचे वाचक सभासद, मराठी वृत्तपत्र लेखक संघ मुंबईचे सभासद, चित्रपट-नाट्य कलाप्रेमी, नागरिक आणि विद्यार्थी हे मोठया संख्येने उपस्थित होते. दादर सार्वजनिक वाचनालय आणि मराठी वृत्तपत्र लेखक संघाच्या वतीने सामाजिक उत्तरदायित्व आणि डॉ. डोंगरे आणि जगदीश पुळेकर यांच्या कामाप्रति कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी या कार्यक्रमाचे आयोजन केले असल्याचे आपल्या प्रस्ताविकात दिगंबर चव्हाण यांनी सांगितले तर कार्यक्रम प्रमुख राजन देसाई यांनी संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. अध्यक्ष रवींद्र मालुसरे यांच्या नेतृत्वाखाली माजी अध्यक्ष विजय कदम, चंद्रकांत पाटणकर, अरुण खटावकर, अनंत आंगचेकर,दिलीप ल सावंत, राजेंद्र लकेश्री, रामचंद्र जयस्वाल,सूर्यकांत भोसले, चंद्रकांत तावडे यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विशेष मेहनत घेतली.

# दुष्काळाशी झुंझणारा शेतकरी आता पुरात बुडाला

## पुराने शेतं वाहून गेली पण सरकारची माणुसकी कुठे गेली?

मराठवाड्यातील गेवराई तालुक्यात यंदाचा पाऊस आशीर्वाद ठरण्याऐवजी शाप ठरला. नेहमी कोरड्या दुष्काळाशी दोन हात करणाऱ्या या भागाने यंदा विपरीत परिस्थिती अनुभवली. गोदावरी आणि सिंदफणा नदीने संतापाचा महापूर ओतला आणि ५४ हून अधिक गावे जलमय झाली. जायकवाडी धरणातून लाखो क्युसेक विसर्ग झाल्यानंतर सुरू झालेला हा जलप्रलय थांबता थांबेना. हा पूर फक्त घरं किंवा शेती वाहून घेऊन गेला नाही, तर शेतकऱ्यांच्या कष्टाची, आशेची आणि भविष्याचीही राख करून गेला.



गावोगावच्या शिवारात उभी असलेली पिकं, फळबागा, जनावरं, घरं आणि संस्कारांची शिदोरी - सगळं काही एका क्षणात नष्ट झालं. उरला तो फक्त चिखल, ओलसर वास आणि डोळ्यांतील पाणी. शेतकरी म्हणतो, आमचं आयुष्य वाहून गेलं. ही केवळ भावनिक हाक नाही; हा इतिहासाचा आक्रोश आहे. पिढ्यान्पिढ्या शेतकरी आपल्या थोड्याशा जमिनीत कष्टाने पीक उभं करतो, थेंबथेंब पाणी साठवून मोसंबी, डाळिंब, पेरू, कपाशी अशी पिकं उभी करतो. पण या पुराने एकदम सगळं पुसून टाकलं. हजारो हेक्टर जमीन खरडून गेली, सुपीक माती वाहून गेली. जनावरं मरून पडली, कांद्याच्या चाळी पाण्यात गेल्या. अनेक शेतकऱ्यांकडे आता घरात धान्य नाही, तर शेतात जमीनही शिल्लक नाही. त्यांचा प्रश्न सरळ आहे - काय खायचं, काय पिकवायचं, आणि कर्ज कसं फेडायचं? हा प्रश्न केवळ गेवराईचा नाही, तर संपूर्ण मराठवाड्याच्या शेतकऱ्याचा आहे.

प्रशासनाची दगडासारखी थंड प्रतिक्रिया पुर आला, गावं जलमय झाली, लोक विस्थापित झाले - या सर्व घटनेत प्रशासनाचं काम काय? स्थलांतर, निवारा आणि जेवणपुरतं सीमित. पाण्याचा विसर्ग सुरू होण्याआधी लोकांना इशारा का दिला नाही? आधीच अतिवृष्टीमुळे जमिनी भिजलेल्या असताना, अचानक लाखो क्युसेक पाणी सोडण्याची जबाबदारी कोण घेणार?

जिल्हाधिकारी यांनी गावे भेट दिली, तळ ठोकला, निवारा शिबिरं सुरू केली. पण शेतकऱ्याला हवी आहे ती तात्काळ आणि भरीव आर्थिक मदत. सध्या सुरू असलेली मदत ही फक्त औपचारिकता आहे - एक वेळचं जेवण, तात्पुरता निवारा. परंतु खरी हाक आहे आमच्या जमिनी वाचवा, आमचं भविष्य वाचवा याची.

सरकारकडून मदतीची आश्वासने दिली जातात. घोषणांचा पाऊस पडतो, पण प्रत्यक्षात कोरडं पडलेलं दिसतं. हेक्टरी काही हजारांची मदत जाहीर केली जाते, पण नुकसान हेक्टरी लाखोंच्या घरात आहे. अशा तुटपुंज्या मदतीने शेतकरी उभारी घेणार कसा? पुरग्रस्तांसाठी तातडीची मदत हा शब्द सरकारसाठी केवळ एक फाईल आहे. वास्तव मात्र वेगळं आहे - शेतकरी तातडीने आधार शोधतोय, पण सरकारी यंत्रणा अजूनही पंचनाम्यांत आणि कागदी अहवालांत अडकली आहे. विरोधकांची निवडक सहानुभूती, सत्ताधारी उदासीन असले, तरी विरोधकही फार वेगळे नाहीत. पुरग्रस्त गावांना भेट देणं, माईकसमोर भावनिक बोलण आणि सरकारवर टीका करणं - एवढ्यावरच त्यांची भूमिका संपते. शेतकऱ्यांच्या हातात आजही काही आलं नाही. विरोधी पक्ष नेहमीच लोकांच्या दु:खात संधी शोधतो, पण प्रत्यक्षात त्यांच्या डोळ्यातील पाणी पुसायला कुणीही नसतं.

१७८० कोटींचं नुकसान - पण भरपाई किती? शेतीतज्ञ यांच्या मते गेवराई तालुक्यातील शेती आणि फळबागांचं नुकसान तब्बल रु १७८० कोटींच्या घरात आहे. पण शेतकऱ्यांच्या खात्यात पडणारी मदत त्याच्या केवळ तुकड्याएवढीच आहे. सरकारच्या दृष्टीने हा आकडा मोठा असेल, पण शेतकऱ्याच्या दृष्टीने हे फक्त उजाड आयुष्याचा हिशेब आहे.

पुरामुळे हजारो कुटुंबं बेघर झाली. शाळा, मंदिरे, खासगी गोदामं - इथेच त्यांचा तात्पुरता संसार उभा राहिला आहे. मुलांच्या शिक्षणाचं भविष्य धोक्यात आलं, कारण शाळाच पाण्यात गेली. जनावरं मेली, विहिरी गाळानं भरल्या. गावोगावचा वीजपुरवठा खंडित झाला. ही माणसं आता कशी उभारी घेणार? सरकार फक्त निवाऱ्याची व्यवस्था करणार, की त्यांच्या उद्धवस्त आयुष्याची नवी पायाभरणी करणार? गरजेचं पाऊल - पण कोण टाकणार? या संकटातून शेतकरी उभारी घेण्यासाठी सरकारने काही ठोस निर्णय तातडीने घ्यायला हवेतः

तातडीने ओला दुष्काळ जाहीर करावा. कर्जमाफीचा निर्णय घ्यावा.२०१९ मध्ये कोल्हापूर-सांगलीसारख्या भागात जसा निर्णय घेतला होता, तसा इथेही घ्यावा. प्रति हेक्टर किमान ५० हजार रुपयांची मदत त्वरित दिली जावी. पुनर्वसनाचा ठोस आराखडा तयार करून घरं, शाळा, मंदिरे यांची उभारणी करावी. नद्यांच्या पाणी व्यवस्थापनाचा दीर्घकालीन आराखडा करावा, जेणेकरून पुढच्या वेळी अशी शोकांतिका टाळता येईल.अखेरचा सवाल

गोदावरी, सिंदफणा आणि अमृता नदीला आलेल्या महापुराने केवळ गावे नाही, तर एक संपूर्ण पिढीचे स्वप्नं वाहून नेले. ही केवळ नैसर्गिक आपत्ती नाही; ही मानवी व्यवस्थापनाची चूक आहे.आज प्रश्न फक्त एवढाच आहे -

शेतकरी कितीदा रडणार, कितीदा पुनर्वसन करणार, कितीदा आपलं आयुष्य पुन्हा उभं करणार? आणि सरकार व विरोधक कितीदा फक्त घोषणांनी त्यांची फसवणूक करणार? जोपर्यंत या प्रश्नाचं प्रामाणिक उत्तर मिळत नाही, तोपर्यंत गेवराईच्या शेतकऱ्यांच्या डोळ्यातील अश्रू हा शासनाच्या आणि राजकारणाच्या अपयशाचा कायमचा पुरावा राहील. पाण्याने शेतं वाहून गेली, घरे उद्ध्वस्त झाली; पण जर प्रशासनानेही माणुसकी वाहून नेली, तर ती खरी शोकांतिका ठरेल.



**जुनेद बागवान गेवराई**
**मो.९७३००७५३१३**

# बळीराजाचे स्वप्न आणि कष्टही वाहून गेले

मातीतून सोनं पिकवणाऱ्या बळीराजाला पुन्हा एकदा नियतीने हरवले.

पुराच्या पाण्यात फक्त त्याच पीकच वाहून गेल नाही तर बळीराजाची स्वप्न, केलेले कष्ट, लेकरांची दिवाळी आणि शाळेची फी पुस्तकही वाहून गेले.अशी भावनिक पोस्ट वाचली. खरोखरच येणाऱ्या हंगामातून आणि येणाऱ्या पिकाच्या विक्रीतून येणाऱ्या पैशातून शेतकऱ्याची अनेक स्वप्न असतात. फार मोठीही नसतात परंतु अशा नैसर्गिक कोपातून ते वाहून जातात. त्याला वर्षा काठी दिवाळीला काही बोनस मिळत नसतो येणाऱ्या पीक विक्रीच्या रकमेतून त्याला सण साजरे करायचे असतात. त्यावरही टीका केली जाते.

अतिवृष्टी आणि अवर्षणग्रस्त परिस्थिती अशा दोन्ही संकटांचा सामना शेतकऱ्यांना करावा लागतो. तर काही कारण ही आपल्या एकूणच व्यवस्थेतून निर्माण झालेंली असतात. येणारे हंगामात उत्पन्न किती येते आणि त्याला बाजारात काय भाव मिळतो याची हमी नसते. कारण बऱ्याच वेळा त्याला त्याचे पीक हमीभावापेक्षाही कमी किमतीत व्यापाऱ्यांना विकावे लागते ही सत्य परिस्थिती नाकारता येत नाही. हमीभावापेक्षा कमी किमतीने खरेदी करणे हा सुद्धा गुन्हा आहे. एक तर हमीभाव द्यावा

किंवा हमीभावानेच बाहेरची खरेदी व्हावी यावर नियंत्रण असावे. हमीभाव देण्यामागे शेतकऱ्याचे नुकसान होऊ नये हा उद्देश असतो परंतु तसे होताना दिसत नाही. नियम कायदे हे फक्त कागदावरच असतात. काही गोष्टी आपल्या हातातील असूनही त्याकडे दुर्लक्ष होते.

आता झालेला नैसर्गिक कोप काही कोणी थोपवू शकत नाही. आलेल्या संकटाला सर्व स्तरातून सरकारी पातळीवरून मदत करून सावरणे हे महत्त्वाचे आहे. मुख्यमंत्र्यांनी दिलेल्या सूचनानुसार बहुतेक पालकमंत्री आपापल्या भागात जाऊन आपत्तीग्रस्त भागाची पाहणी करत आहेत तसेच त्यांना धीर देत आहे. मुख्यमंत्र्यांनी तातडीची मदत करणे विषयी जिल्हाधिकाऱ्यांना आदेश दिलेले आहेत.

मुख्यमंत्री .ना देवेंद्र फडणवीस दोन्ही उपमुख्यमंत्री ना.एकनाथ शिंदे,ना.अजित पवार,ना. गिरीश महाजन ना.छगन भुजबळ आणि मंत्रिमंडळातील बहुसंख्यमंत्री, पालकमंत्री, आपापल्या भागात जाऊनही नुकसानग्रस्त शेतकऱ्यांचे सांत्वन करून आपण भक्कमपणे त्यांच्या पाठीशी आहोत त्यांनी खचून जाऊ नये असे आवाहन करत आहेत.

विरोधी पक्षातील शरद पवार, उद्धव ठाकरे ,बाळासाहेब थोरात,सत्ताधारी विरोधी पक्षातील आमदार खासदार सर्वजण नुकसान ग्रस्त भागात पहाणी भेट देत आहेत.. तरीपण यामागे पण.. परंतु.. हे आहेच. भेटी देताना विरोधी पक्षाकडून मागण्या होत आहेत. उद्धव ठाकरे म्हणतात पंजाब सरकार जसे शेतकऱ्याला पन्नास हजार रुपये हेक्टरी मदत करते तशी मदत द्यावी. संपूर्ण कर्जमाफी करावी. तुमचा कर्जमाफीचा मुहूर्त कधी निघणार ?,योग्य वेळ कधी येणार आहे.? मंत्र्यांनी लोकप्रतिनिधी त्यांचे दौरे थांबवावे व कर्मचाऱ्यांना काम करू द्यावे नाहीतर पंचनामाचे काम लवकर होणार नाही, त्यात अडचणी निर्माण होईल असे मत शरद पवार यांनी व्यक्त केले आहे. तर नुकसान ग्रस्त भागाची पाहणी केल्याशिवाय नुकसानीचा अंदाज येणार नाही असे मत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केले आहे. मुख्यमंत्री व दोन्ही उपमुख्यमंत्र्यांनी केंद्रातून मदत घेऊन यावे नाहीतर तिकडेच राहावे अशा प्रकारे वक्तव्य भा.रा. काँग्रेसचे अध्यक्ष सपकाळ यांनी केले आहे.

शेतकऱ्या विषयी आणि आपत्तीग्रस्तांसाठी जर काही वाटत असेल तर दसरा मेळाव्यासाठी होणारा खर्च उद्धव ठाकरे यांनी मुख्यमंत्री निधीला द्यावा, भाजपचे प्रवक्ते केशव उपाध्ये यांनी विधान केले आहे. तसेच ना. राधाकृष्ण विखे पाटील,ना. हसन मुश्रीफ,ना. चंद्रकांत बावनकुळे यांनी उद्धव ठाकरे यांच्या वक्तव्यावर तीव्र प्रतिक्रिया व्यक्त केली आहे.

थोडक्यात काय तर त्यातही एकमेकांच्या बोलण्यावरून शब्दच्छल चालला आहे. अशा गंभीर परिस्थितीत मतभेद विसरून राजकीय हेवेदावे बाजूला ठेवून एकत्र येणे महत्त्वाचे आहे.

विदर्भ, मराठवाडा, उत्तर महाराष्ट्र आणि महाराष्ट्रातील जवळपास ३४ जिल्ह्यांना अतिवृष्टीचा मोठा फटका बसला आहे. असंख्य लोक बेघर झाली आहेत. घरामध्ये पाणी शिरले आहे.शेती वाहून गेली आहे.होत्याचं नव्हते झाले आहे.

विदर्भातील गोंदिया, भंडारा, चंद्रपूर, हिंगोली, यवतमाळ, वाशिम, तर मराठवाड्यातील लातूर,परभणी, बीड,जालना, धाराशिव, नांदेड, उत्तर महाराष्ट्रातील जळगाव, नंदुरबार, धुळे, नाशिक, अशा तसेच सोलापूर, ठाणे, पालघर या भागात शेतीचे अतोनात नुकसान झालेले आहे. ५०% च्या वर नुकसानी आहे तर काही ठिकाणी शेतच वाहून गेले आहेत अनेक गावांचा संपर्क तुटलेला आहे तिथे खाण्यापिण्याचे हाल आहेत. अनेक संस्थांकडून सरकारकडून त्यांना तशी मदत मिळत आहे. परंतु झालेले नुकसान आणि अजून होणारे नुकसान काही कळणार नाही. बळीराजाच्या हातून हंगाम गेल्याचे मत व्यक्त केले जात आहे.अंदाज बांधला जात नाही.



वर्षभर कष्ट करून आपल्या येतात राब राब राबून आपल्या सगळ्यांसाठी धान्य पिकवतो त्याच्या पाठीशी उभे राहणे हे आपल्या सगळ्यांचेच कर्तव्य आहे तेव्हा ह्या शेतकऱ्याच्या मदतीला राजकीय रंग भरू नये.

मुख्यमंत्र्यांनीच पत्रकारांशी बोलतानामोठ्या प्रमाणावर हेक्टर मधील पिकाचे नुकसान झाल्याचे म्हटले आहे. सर्वाधिक नुकसान बीड जिल्ह्यात झालेले आहे असे समजते जवळपास ३४ जिल्ह्यामध्ये अतिवृष्टीमुळे पिकांचे तसेच घरादारांचे नुकसान झालेले आहे.६८.७० लाख हेक्टर पिकांचे नुकसान झाल्याची बातमी प्रसिद्ध झाली आहे.त्यात अजूनही वाढ होवू शकते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणीस यांनी सरासरीपेक्षा अधिक पाऊस झाल्याचे मान्य केले आहे त्यामुळे आता ओला दुष्काळ जाहीर करावा मदत द्यावी अशी मागणी स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे अध्यक्ष राजू शेट्टी यांनी केली आहे पण सरकार दुष्काळ जाहीर करण्याऐवजी बाकीच्या गोष्टी पाहत आहे निर्णय घेण्याचे बाबतीत टाळा टाळ होत आहे.. असे म्हटले आहे.सरकार फक्त सहा हजार आठशे रुपये हेक्टरी मदत देते यावर प्रहार चे अध्यक्ष बच्चू कडू यांनी टीका केली आहे.

संजय राठोड यांचे जवळही शेतकऱ्यांनी संताप व्यक्त केला.

धाराशिव येथे मदतीसाठी च्या किटवर एकनाथ शिंदे.. सरनाईक याची नावे असून अशा परिस्थिती सुद्धा जाहिरात बाजी सुरू आहे म्हणून संताप व्यक्त केला जात आहे.

ज्यांचे घरदार, शेती, पीक, गुरेढोरे वाहून गेले ते कोलमडून गेले आहेत. उद्विग्न अवस्थेत ते आपला संताप, राग व्यक्त करीत आहेत.

सदाभाऊ खोत यांना माध्यमांना मुलाखत देवू नका प्रत्यक्ष बांधावर या,मग बोला ह्या शब्दात सूनावले.

नुकसान मदतहेक्टरी ८६०० देतात...भिक देतात..

शेतकऱ्यांचा बाजार मांडलाय संतप्त झालेला शेतकरी आपली व्यथा मांडत आहे.

अतिवृष्टीमुळे राज्य ७० लाख हेक्टर पेक्षा अधिक शेती नुकसान झाले आहे लाखो शेतकऱ्यावर संकट कोसळले आहे मुख्यमंत्री फडणीस एकनाथ शिंदे अजित पवार यांनी गृहमंत्री शहा यांच्याकडे मदती साठी पत्र दिले आहे . आता तूर्तास २२१५ लाख कोटीची मदत दिली असून ती अतिशय कमी आहे त्यासाठी केंद्राकडे मागणी करण्याची पत्र दिले आहे.

तसेच केंद्राकडूनही मदत मिळण्यासाठी मुख्यमंत्र्यांनी प्रत्यक्ष पंतप्रधानांची भेट घेऊन मदत मिळणे विषयी चर्चा केली असून लवकरच केंद्राकडून मदत मिळेल अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

आपत्तीग्रस्तांन साठी देवस्थानांनी मदत जाहीर केली आहे.

श्री.सिध्दीविनायक देवस्थान.मुंबई १० कोटी.श्री गजानन महाराज.संस्थान शेगाव १कोटी११लाख. श्री साईबाबा संस्थान.शिर्डी.१कोटी. श्री विठ्ठल मंदिर पंढरपूर.१ कोटी. अशी मदत जाहीर केल्याची वार्ता प्रसिद्ध झाली आहे.

आपत्ती व्मवस्थापन मंत्री ना. गिरीश महाजन यांनी नाशिक येथे पत्रकारांशी बोलताना सांगितले की आपत्तीची परिस्थिती विचारापलीकडची आहे. गंभीर आहे. जास्तीत जास्त मदत करावी लागणार आहे. काही ठिकाणी तर शेतजमीन वाहून खडक उघडे दिसताय .अशा परिस्थितीत सगळ्यांनी होईल ती मदत करण्यासाठी आवाहन केले आहे.

नाम चे संस्थापक नाना पाटेकर यांची नाम संस्था ही मदत करत असून त्यांनाही मदतीसाठी आवाहन केले आहे.

शिक्षकांनी,महसूल कर्मचाऱ्यांनी एक दिवसाचा मदत देणार असल्याचे वृत्त प्रसिद्ध झाले आहे. आमदार खासदार मंत्री यांनीही आपले एक महिन्याचे वेतन देण्याचे विषयीची बातमी प्रसिद्ध झाली आहे.

अनेक संस्था, व्यक्ती मदतीसाठी पुढे येत आहे. आपण मदत करतोय तर काही उपकार करत नाहीये, ती आपली प्रत्येकाची जबाबदारी आणि कर्तव्य आहे,ही भावना मनात असू द्यावी.

सरकार कोणत्याही पक्षाचे असो काही महत्त्वाच्या बाबी आहेत त्याकडे लक्ष देणे व निर्णय घेणे आवश्यक आहे.

पीकविमा पद्धतीचे निकष,सरकारी मदतीचे निकष..


हमीभावाने पिकमालाची खरेदी करणे,

शासकीय योजनांचा होणारा लाभ,

खते बियाणे रासायनिक द्रव्ये उपलब्धता,

विज पूरवठा,सिंचन योजना,

वेळोवेळी दिलेल्या आश्वासनाची पुर्तता,करणे.



जेणेकरून या व्यवस्थेमध्ये शेतकऱ्याला डिप्रेशन येणार नाही आणि तो उदासीन होऊन आत्महत्या सारखा मार्ग अवलंबणार नाही याचीही दक्षता घ्यायला हवी कारण अशा गोष्टी मधूनच वेगळा मार्ग अवलंबला जातो. शेतकरी जगला पाहिजे,शेती पिकली पाहिजे. अर्थव्यवस्थेचा कणा म्हणतो ती शेती पिकवणारा शेतकरी ही ताठमानेने जगला पाहिजे.तूर्त एवढेच.

**दिलीप देशपांडे. जामनेर. जिल्हा जळगाव.**
**मोबा.८९९९५६६९१७**

# भाजप जालना महानगर जम्बो कार्यकारिणी जाहीर

## स्थानिक स्वराज्य निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर पक्षाची सज्जता; ७० हून अधिक सदस्यांचा समावेश; विविध घटकांकडे प्रतिनिधित्व

**जालना । प्रतिनिधी -** भारतीय जनता पार्टी जालना महानगर कार्यकारिणी जाहीर करण्यात आली असून, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या आगामी निवडणुकांचा विचार करून ही संघटनात्मक रचना आखण्यात आली आहे. माननीय प्रदेशाध्यक्ष आमदार रविंद्रजी चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली व प्रदेश नेतृत्वाच्या मान्यतेनुसार, माजी केंद्रीय राज्यमंत्री रावसाहेब दानवे पाटील, पालकमंत्री पंकजाताई मुंडे, माजी मंत्री तथा आमदार बबनराव लोणीकर, ग्रामीण जिल्हाध्यक्ष आमदार नारायण कुचे, पंचायत राज समिती अध्यक्ष आमदार संतोष पाटील दानवे व आमदार कैलास गोरंट्याल यांच्या नेतृत्वाखाली ही कार्यकारिणी घोषित झाली आहे.

या कार्यकारिणीत जिल्हाध्यक्ष, उपाध्यक्ष, सरचिटणीस, चिटणीस, कोषाध्यक्ष, सोशल मीडिया प्रमुख, विविध विभाग प्रमुख तसेच मोठ्या संख्येने सदस्यांचा समावेश करण्यात आला आहे. पक्ष संघटन अधिक बळकट करणे, स्थानिक पातळीवर कार्यकर्त्यांचे जाळे विस्तार करणे व निवडणुकीत विजय मिळवण्यासाठी संघटनाला चालना देणे हे या रचनेमागील प्रमुख उद्दिष्ट असल्याचे सांगण्यात आले.



भास्कर मुकुंदराव दानवे यांची जिल्हाध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे.

उपाध्यक्षपदी सिद्धिविनायक वसंतराव मुळे, धनराज मोहनलाल काबलिये, ज्ञानेश्वर रावसाहेब ढोबळे, सुहास विजयकुमार मुंडे, राकेश (दुर्गेश) रतनलाल कुरील, रेखा बाबुराव भवर, भागवत किसनराव बावणे, परसराम किसनराव तळेकर, रमेश ब्रिजलाल गौरक्षक व शिवाजीराव संतारामजी शेजूळ यांची निवड झाली आहे.

सरचिटणीस म्हणून सुनील सुभाष पवार, वसंत माधवराव शिंदे, अमोल दत्तात्रय कारंजेकर, अरुणा शिवराज जाधव व शिवप्रकाश खंडूजी चितळकर यांची जबाबदारी निश्चित झाली आहे.

चिटणीस पदावर कपिल रावणराव दहेकर, उमेशकुमार पन्नालाल अग्रवाल, संगीता अर्जुन घोडके, महेंद्र अंबादास अकोले, सुमित सुधाकर सुरडकर, सुभाष चंदूलाल सले, प्रदीप हिंमतराव देठे, बद्रीनारायण विठ्ठलराव भसांडे, अलोक माधवराव सरवडीकर व विलास उत्तमराव खरात यांची नेमणूक करण्यात आली आहे.

मनोज दावीदराव बिडकर यांना सोशल मीडिया प्रमुखपदाची जबाबदारी देण्यात आली आहे.

कोषाध्यक्षपदी राहुल किशोर अग्रवाल यांची निवड झाली आहे.

याशिवाय मोठ्या संख्येने सदस्यांचा कार्यकारिणीत समावेश करण्यात आला आहे. त्यामध्ये विनोद मनोहर शिनगारे, ज्ञानेश्वर पडोळ, ज्ञानेश्वर कडूबा उगले, हरिभाऊ भास्करराव गोरे, जगू हरिभाऊ ढवळे, गणेश सोपान कळकुंबे, छबुराव राठोड, विनायक वाचू राठोड, निवृत्तीनाथा गायकवाड, लक्ष्मीबाई अशोक लहाने, रुख्मिणी सुभाष पवार, गोविंद रमेश चिलवर, गीता रामेश्वर राजगुडे, रोषण जयसिंग चौधरी, विजय पांगारकर, गणेश जल्लेवर, रोहित रमेश नलावडे, सेवकराम मदनलालजी नारीयलवाले, बबनराव भिकाजी उजेड, तुकाराम कळकुंबे, सतीष बाबासाहेब दाभाडे, कृष्णा सोमधाने, विष्णू भुतेकर, पप्पू साहेबराव पोटे, दत्तू नाना बागल, बाबूलाल चव्हाण, मधुकर छोटू पवार, किरण लाला इंगळे, सोपान तुकाराम पेंढारकर, सोमनाथ माणिकराव गायकवाड, चेतन उत्तमचंद देसरडा, प्रभुलाल नारायण गोमतीवाले, आनंद शिवाआप्पा झारकंडे, प्रशांत सदाशिव गाडे, चंपालाल छोटेलाल भगत, नेमीचंद बालचंद भूरेवाल, रवि गोवर्धन अग्रवाल, बळीराम किसनराव शिंदे, विजय पंडितराव जाधव, शांतीलाल रामचंद्र राऊत, लक्ष्मण लालसिंग वर्मा, सतीश मधुकरराव अकोलकर, रणजीत राजपाल रिडला, महादेव कावळे, नागेश बेनिवाल, दिनेश गणेशलाल व्यास, ममता गोपाल कोंड्याल, सुरेंद्र महेंद्र शेडूते, सुधाकर विश्वनाथ खरात, सिद्धेश्वर दगडाआप्पा हाजबे, मनोज इंगळे, सुदर्शन देविदास काळे, नारायण किसन मोहिते, समर्पण विजयसेनानी, वर्षाताई ठाकूर, आत्माराम लिंबोने, प्रकाश जायभाये, रोहित दिपवाल, रमेश साळूबा दानवे, हरिभाऊ बाबुराव नाटकर, अमन बालाप्रसाद मित्तल, सुनिता अर्जुन जाधव, मनोज निवृत्ती पाचफुले, रमेश जगन्नाथ गोगडे, अविनाश यशवंतराव देशपांडे, ज्ञानेश्वर मोरे, करण फुलचंद झाडीवाले, प्रकाश केवलचंद सुराणा, बाबू श्रावण पवार, महावीर रामकुमारजी ढक्का, विनोद विठ्ठलराव रत्नपारखे, अजय नारायण भरतीया, कपिल श्रावण भुरेवाल, राजेश नरसिंगराव स्वामी, आनंद राजेंद्र वाघमारे, राजेश उत्तमराव पवार, ॲड. गोपाल नारायण मोरे, प्रभाकर रामजी डोंगरे, गणेश तुकाराम ढवळे, मास्वीन्द्र रामदास ढगे, एकनाथ दत्तात्रय कुटे, नारायण आसाराम डोंगरे, विष्णु संतराव ढोबळे, शिवाजी रामचंद्र गायकवाड, बद्रीनाथ दौलतराव कायंदे, मनोहर बाबुराव उघडे यांचा समावेश आहे.

या कार्यकारिणीच्या घोषणेनंतर भाजपने जालन्यातील आगामी निवडणुकांसाठी आपली तयारी सुरू केली आहे. कार्यकारिणीत विविध सामाजिक घटकांचा समावेश करून सर्वसमावेशकता जपण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये बहुमत मिळवण्याचा पक्षाचा मानस असून, या नवीन कार्यकारिणीमुळे कार्यकर्त्यांना संघटनात्मक बळ मिळेल, असा विश्वास पक्ष नेतृत्वाने व्यक्त केला आहे.

# जालना वनविभागातील भ्रष्टाचाराचा पर्दाफाश

## लाचलुचपत प्रतिबंधक पथकाची कारवाई

**जालना । प्रतिनिधी -** जिल्ह्यात वनविभागातील भ्रष्टाचाराचे प्रकरण पुन्हा एकदा उघड झाले आहे. लाचलुचपत प्रतिबंधक विभाग संभाजीनगर पथकाने काल (३० सप्टेंबर, मंगळवार) दुपारी जालन्यातील वनपरिक्षेत्र अधिकारी कार्यालयात सापळा रचून वनपाल नानासाहेब राऊत आणि वनरक्षक छाया खरात या दोघांना २५ हजारांची लाच स्वीकारताना रंगेहात पकडले.

तक्रारदाराविरोधात लिंबाच्या झाडाची विनापरवाना अवैध तोड व वाहतूक केल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. या प्रकरणात मदत करण्यासाठी आरोपींनी तक्रारदाराकडे २५ हजार रुपयांची लाच मागितली. मात्र तक्रारदाराने लाच देण्यास नकार देत सरळ लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार दाखल केली.

लाचलुचपत विभागाने तपास सुरू केला आणि सापळा रचला. आरोपी वनपाल राऊत यांच्या सांगण्यानुसार वनरक्षक छाया खरात यांनी तक्रारदाराकडून पैसे स्वीकारले. शासकीय पंचांच्या उपस्थितीत रकमेची खात्री करून दोन्ही आरोपींना तात्काळ ताब्यात घेण्यात आले. सदर बाजार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करून पुढील तपास सुरू आहे.

**आधीच्या तक्रारी आणि सामाजिक दबाव**

या अधिकाऱ्यांविरोधात काही दिवसांपूर्वीपासूनच नागरिक व सामाजिक कार्यकर्त्यांकडे अनेक तक्रारी येत होत्या. सामाजिक कार्यकर्ते साद




बीन मुबारक यांनी हा मुद्दा उचलून धरला होता. मात्र, वनविभागातील संबंधित अधिकाऱ्यांनी पुरावे द्या असा पवित्रा घेत वेळ मारून नेली होती.

आता झालेल्या लाचलुचपत पथकाच्या कारवाईनंतर या आरोपांची खात्री पटली असून, भ्रष्ट अधिकाऱ्यांचा अखेर भांडाफोड झाला आहे.

**नागरिकांमध्ये संताप**

या कारवाईनंतर जनतेत मोठा संताप पसरला आहे. कारण वनविभागासारख्या महत्त्वाच्या विभागातच जर अधिकारी लाच मागत असतील, तर सामान्य नागरिकांचे संरक्षण कसे होणार, असा प्रश्न विचारला जात आहे. यापुढेही या अधिकाऱ्यांच्या आधीच्या लाचखोरी प्रकरणांची चौकशी व्हावी अशी मागणी होत आहे.

लाचलुचपत विभागाने उचललेले हे पाऊल जालना जिल्ह्यातील प्रशासनाच्या पारदर्शकतेसाठी महत्वाचे ठरणार आहे. मात्र, या घटनेतून एकच स्पष्ट होतं - भ्रष्टाचार रोखण्यासाठी केवळ कारवाई पुरेशी नाही, तर सातत्यपूर्ण तपासणी, नागरिकांची सतर्कता आणि प्रशासनातील कठोर शिस्त हवी.

## बंजारा समाजाच्या शिष्टमंडळाने घेतली जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांची भेट

**जालना -** जिल्ह्यातील बंजारा समाजाच्या शिष्टमंडळाने बंजारा समाजाचा समावेश अनुसूचित जमातीमध्ये करण्यासाठी जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांची भेट घेवून सविस्तर चर्चा केली. भारतामधील काही राज्यात बंजारा समाजाचा समावेश अनूसूचित जमातीमध्ये आहे. महाराष्ट्रातील बंजारा समाजाचाही हैद्राबाद गॅझेटियरचा आधार घेत अनुसूचित जमातीमध्ये समावेश करण्यासाठी बंजारा समाजाच्या शिष्टमंडळाने चर्चात्मक संवाद साधला. याप्रसंगी जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी आस्थेने व सुहदयतेने संवाद साधत त्यांचे म्हणने ऐकुन घेतले. मागण्या या शासनापर्यंत पोहचविण्यासाठी योग्य ती कार्यवाही करण्यात येईल, असेही सांगितले.

# वरिष्ट व निवड श्रेणी मंजुरीसाठी विशेष शिबीर आयोजित करा

**विशाल देशमुख । टेंभूर्णी -** वरिष्ठ व निवड श्रेणी प्रस्ताव मंजुरीसाठी व प्रमाणित करण्यासाठी तात्काळ विशेष शिबिर आयोजन करावे यासाठी आज दिनांक २९ सप्टेंबर २०२५ निवेदित देण्यात आले. मागील काही महिन्यापुर्वी राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र,पुणे यांनी वरिष्ठ श्रेणी व निवड श्रेणी प्रशिक्षण आयोजित केलेले होते. हजारोंच्या संख्येने प्रशिक्षणार्थी शिक्षक या प्रशिक्षणात सहभागी झाले होते. ज्यांना हे प्रमाणपत्र प्राप्त झाले आहे त्यांना त्वरीत वेतनश्रेणी लागू करण्यात यावी यासाठी भाई चंद्रकांत चव्हाण (जिल्हा सचिव) यांच्या नेतृत्वाखाली संघटनेचे पदाधिकारी महानगर सचिव नवनाथ मंत्री, अशोक ढमढेरे, विनोद केनेकर, डॉ. पद्माकर पगार, विलास चव्हाण, संतोष सुरडकर, कृष्णा गोंडे, दिपक वाघ, रावसाहेब बोरसे, अजित जाधव, अरुणा चौधरी, शितल कवडे, स्वाती बोंडे, रेखा साकळे, सोनाली गव्हाणे हे सर्व मराठवाडा शिक्षक संघाचे पदाधिकारी उपस्थित होते.



# सेवा सप्ताहाच्या निमित्ताने मतदारसंघातील सर्वसामान्य नागरिकांना आरोग्याच्या विविध सुविधा मिळवून देण्यासाठी लोकप्रतिनिधींसह भाजपा कार्यकर्ते तत्पर - आमदार बबनराव लोणीकर यांचे प्रतिपादन

## मंठा-पाटोदा- सेलू तालुका संपर्क सुकर! ७ कोटी रुपयांच्या पाटोदा नदीवरील पुलाचे आमदार लोणीकरांच्या हस्ते लोकार्पण

**परतूर । प्रतिनिधी -** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसा पासून २ ऑक्टोबर गांधी जयंती पर्यंत आयोजित सेवा सप्ताह कार्यक्रमांतर्गत ग्रामीण भागातील सर्वसामान्य नागरिकांना आरोग्याच्या सुविधा अधिकाधिक तत्पर आणि जलद उपलब्ध करून देण्यासाठी भारतीय जनता पार्टीच्या सर्व लोकप्रतिनिधी सह कार्यकर्त्यांनी पुढाकार घेतला असून अधिकाधिक नागरिकांना आरोग्याच्या सुविधा मिळवून देण्यासाठी भाजपाचा कार्यकर्ता सदैव तत्पर असतो. प्राथमिक आरोग्य केंद्राच्या माध्यमातून परिसरातील गरजू आणि सामान्य लोकांना दर्जेदार आरोग्य सेवा स्थानिक स्तरावर उपलब्ध होईल. ग्रामीण भागातील नागरिकांना उपचारांसाठी आता लांबच्या शहरात जावे लागणार नाही. या केंद्रात चांगल्या सुविधा आणि पुरेसा कर्मचारी वर्ग उपलब्ध करून देण्यासाठी शासन कटिबद्ध आहे. हे प्राथमिक आरोग्य केंद्र सुरू झाल्यामुळे परिसरातील सुमारे २० ते ३० हजार नागरिकांना आरोग्य सेवा मिळणार आहेत. यामुळे माता आणि बालकांच्या आरोग्याकडे अधिक लक्ष देणे शक्य होईल. असे प्रतिपादन आमदार बबनराव लोणीकर यांनी यावेळी सांगितले.

परतुर तालुक्यातील श्रीष्टी व मंठा तालुक्यातील पाटोदा येथील नागरिकांसाठी आरोग्याच्या सुविधांनी परिपूर्ण असणारे व अनेक वर्षांपासून मागणी असलेल्या नवीन प्राथमिक आरोग्य केंद्राचे लोकार्पण माजी मंत्री तथा विद्यमान आमदार बबनराव लोणीकर यांच्या शुभहस्ते मोठ्या उत्साहात पार पडले. हे केंद्र नागरिकांसाठी वरदान ठरेल, असा विश्वास आमदार बबनराव लोणीकर यांनी व्यक्त केला.

प्राथमिक आरोग्य केंद्र हे ग्रामीण भागातील आरोग्य सेवेचा पहिला आणि सर्वात महत्त्वाचा आधारस्तंभ आहे.

**स्थानिक स्तरावर आरोग्य सेवा**

प्राथमिक आरोग्य केंद्रामुळे लोकांना गावाजवळ वैद्यकीय सल्ला आणि उपचार मिळतात. यामुळे उपचारासाठी मोठ्या शहरांमध्ये जाण्याचा वेळ आणि खर्च वाचतो. विशेषतः ज्येष्ठ नागरिक, महिला आणि लहान मुले यांना याचा मोठा फायदा होतो.

**प्रतिबंधात्मक आणि उपचारात्मक आरोग्य**

या केंद्रांमध्ये केवळ आजारांवर उपचारच केले जात नाहीत, तर आजारांना प्रतिबंध करण्यावरही भर दिला जातो. लहान मुलांचे सहा जीवघेण्या आजारांपासून संरक्षण करण्यासाठी लसीकरण मोहीम, गर्भवती महिलांची नियमित तपासणी, सुरक्षित प्रसूती आणि बाळांतपणानंतरची काळजी, संततिनियमनाचे आणि कुटुंब नियोजनाचे मार्गदर्शन आणि सेवा पुरवली जाते.

**राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रमांची अंमलबजावणी**

हिवताप (मलेरिया), क्षयरोग, कुष्ठरोग, एड्स आणि अंधत्व नियंत्रण यांसारख्या राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रमांची प्रभावी अंमलबजावणी प्राथमिक आरोग्य केंद्राच्या स्तरावर केली जाते. यामुळे मोठ्या लोकसंख्येला आरोग्य सुरक्षितता मिळते.

**आरोग्य शिक्षण आणि जनजागृती**

आरोग्य केंद्र लोकांना स्वच्छता, संतुलित आहार आणि आरोग्यदायी सवयींबद्दल माहिती देऊन आरोग्य शिक्षण देते. यामुळे लोकांना स्वतःच्या आरोग्याची काळजी घेण्यास मदत होते आणि अनेक आजार टाळता येतात.

**संसर्गजन्य रोगांवर नियंत्रण**

साथीचे रोग किंवा संसर्गजन्य आजार पसरल्यास, प्राथमिक स्तरावर निदान आणि उपचार करून त्यांचा प्रसार रोखण्याचे महत्त्वाचे काम प्राथमिक आरोग्य केंद्रामार्फत केले जाते. प्राथमिक आरोग्य केंद्र हे ग्रामीण भागाच्या आरोग्याची काळजी घेणारे एक अत्यंत महत्त्वाचे आणि अत्यावश्यक केंद्र आहे असेही आमदार बबनराव लोणीकर यावेळी म्हणाले.

**पाटोदा नदीवरील पुलाचे आमदार लोणीकरांच्या हस्ते लोकार्पण**

मंठा तालुक्यातील जनतेची अनेक वर्षांची मागणी पूर्ण झाली असून, ७ कोटी रुपये खर्चून उभारण्यात आलेल्या पाटोदा नदीवरील उंच पुलाचे लोकार्पण आज भाजपचे ज्येष्ठ नेते आणि आमदार बबनराव लोणीकर यांच्या हस्ते करण्यात आले. या महत्त्वपूर्ण प्रकल्पामुळे परिसरातील २० हून अधिक गावांचा शाश्वत आणि सुरक्षित संपर्क आता कायम राहणार आहे. हा पूल मंठा-पाटोदा- सेलू तालुका मार्गावरील वाहतूक सुरळीत करण्यासाठी अत्यंत महत्त्वाचा होता. विशेषतः पावसाळ्यामध्ये पाटोदा नदीला पूर आल्यावर या भागातील अनेक गावांचा संपर्क तुटायचा, ज्यामुळे विद्यार्थी, शेतकरी आणि रुग्ण यांना मोठा त्रास सहन करावा लागत होता. असेही आमदार बबनराव लोणीकर यावेळी म्हणाले.




प्रगतीचा पूल, थांबलेला संपर्क जोडला; गावाचा त्रास कमी झाला. लोकार्पण सोहळ्यादरम्यान बोलताना आमदार लोणीकर यांनी या पुलाचे महत्त्व अधोरेखित केले. ७ कोटी रुपयांचा हा पूल केवळ सिमेंट-काँक्रिटचा नाही, तर मंठा आणि परिसरातील गावांसाठी प्रगतीचा आधारस्तंभ आहे. गेल्या अनेक वर्षांपासून पावसाळ्यात होणारी अडचण आणि नागरिकांचे हाल मी पाहिले आहेत. हा पूल आता शेतमालाची वाहतूक, विद्यार्थ्यांचे शिक्षण आणि आपत्कालीन आरोग्य सेवा विनाअडथळा सुरू ठेवेल, असे लोणीकर म्हणाले. यावेळी त्यांनी केंद्र आणि राज्य सरकारच्या सहकार्याने ग्रामीण भागातील पायाभूत सुविधा मजबूत करण्यासाठी आपण कटिबद्ध असल्याचे देखील आमदार बबनराव लोणीकर यांनी सांगितले.

यावेळी परतुर तालुकाध्यक्ष तथा सभापती शत्रुघ्न कणसे सतीशराव निर्वळ भाजपा मंठा तालुकाध्यक्ष नितीन राठोड अंकुशराव बोराडे पंजाबराव बोराडे गणेशराव चव्हाळ सरपंच संगीता चव्हाळ जिल्हा परिषद सदस्य रोहिणीताई बोराडे अजय अवचार रमेश भापकर नितीन जोगदंड शिवाजी पाईकराव संभाजी वारे उपविभागीय पोलीस अधिकारी श्री रेंगे, जिल्हा आरोग्य अधिकारी जयश्री भुसारे दिगंबर बोराडे अशोकराव बरकुले कैलास बोराडे नागेश घारे अमोल मोरे सरपंच किरण अंभूरे कैलास चव्हाण माउली गोंडगे अमोल गाजरे विलास घोडके राजभाऊ खराबे अर्जुन राठोड प्रभाकर जाधव सिताराम राठोड बंकटराव सोळंके रवींद्र सोळंके बाळासाहेब लहाने अरुण खराबे वसंत बागल तहसीलदार प्रतिभा गोरे गटविकास अधिकारी संतोष गगनबोणे जिल्हा परिषद सदस्य किशोर हानवते दारासिंग चव्हाण बळीराम कवळे मनोज देशमुख किशोर नवल बाळासाहेब तौर सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपअभियंता निवारे अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ मस्के राष्ट्रीय आरोग्य अभियान जिल्हा परिषद जालना चे उपअभियंता श्री कनोजे तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ. नवल तालुका आरोग्य अधिकारी डॉ कुंडकर प्राथमिक आरोग्य केंद्र पाटोदा च डॉ नीलवर्ण डॉ खरात डॉ जीवन मुरक्या डॉक्टर मोरे डॉक्टर डाके डॉ वाडेकर सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी, स्थानिक लोकप्रतिनिधी आणि हजारो नागरिक उपस्थित होते. पुलाच्या लोकार्पणाने नागरिकांनी आनंद व्यक्त करत आमदार लोणीकर यांचे आभार मानले.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.